K. C. E. Society's
**Moolji Jaitha College**
An 'Autonomous College' Affiliated to
K.B.C. North Maharashtra University, Jalgaon.
NAAC Reaccredited Grade - A (CGPA : 3.15 - 3rd Cycle)
UGC honoured "College of Excellence" (2014-2019)
DST(FIST) Assisted College

KNOWLEDGE IS POWER
ESTD. 1945

के. सी. ई. सोसायटीचे
**मूळजी जेठा महाविद्यालय**
क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित
'स्वायत्त महाविद्यालय'
नॅकद्वारा पुनर्मानांकित श्रेणी -'ए'(सी.जी.पी.ए. : ३.१५ - तिसरी फेरी)
विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा घोषित 'कॉलेज ऑफ एक्सलन्स' (२०१४-२०१९)
डी.एस.टी. (फीस्ट) अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त

**परीक्षा विभाग** **दिनांक:-०९-०५-२०२२**

**परिपत्रक क्र. Exam ०४/२०२२ (सुधारीत)**

# -:विद्यार्थ्यांसाठी सूचना:-

क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास प्राप्त झालेल्या पत्र क्रं. २०२२/ Pra. Kra.१२५/ विशि-३ दि.२७ एप्रिल २०२२ व स्वायत्त महाविद्यालयाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्षे २०२१-२२ मधील उन्हाळी परीक्षा दि.०१ जुन २०२२ पासुन आयोजित करण्यात येतील. त्यामुळे याआधी प्रसिध्द झालेले दि.१८/०४/२०२२ रोजी परीपत्रक क्रं. Exam ०४/२०२२ व दि.२२-०४-२०२२ रोजी प्रसिध्द झालेले परीक्षेचे वेळापत्रक रदद समजावे व नव्याने दि.०१ जुन २०२२ पासून आयोजित करण्यात येणा-या परीक्षेच्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षेसाठी उपस्थित रहावे. या बदलांची संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. नविन वेळापत्रक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**विषय:- शैक्षणिक वर्षे २०२१-२२ मधील माहे जून २०२२ मध्ये होणाऱ्या संत्रात परीक्षा प्रणालीबाबत...**

**पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी:-**

- उपरोक्त विषयास अनुसरून विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की शैक्षणिक वर्षे २०२१-२२ प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी, बी.बी.ए, बी.सी.ए, बी.व्होक आणि प्रथम व व्दितीय वर्ष बी.व्ही.ए या वर्गाच्या संत्रात परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) पॅटर्ननुसार OMR शीटवर महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहुन द्यावयाचे आहेत.
- पदवीच्या प्रथम वर्षाच्या AECC-1111, ENV-55555 व व्दितीय वर्षाच्या सामान्य ज्ञान या विषयांच्या संत्रात परीक्षादेखील विद्यार्थ्यांनी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) पॅटर्ननुसार OMR शीटवर महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन द्यावयाचे आहेत.
- पदवी प्रथम वर्ष नॉन क्रेडीट कोर्सेस SP-11,SP-12,YOG-11, YOG-12, MUS-11, MUS-12, NCC-11, NCC-12 या परीक्षेसाठीचे वेळापत्रक संबंधित विभागाकडुन उपलब्ध करून देण्यात येईल.
- **स्वायत्त महाविद्यालय परीक्षा विभागाने निच्छित केलेले पदवी परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहिल.**

1) पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ स्वरूपात/ बहुपर्यायी Multiple Choice Questions (MCQ) असेल व परीक्षेसाठी एकूण गुण पॅटर्ननुसार राहतील.
2) पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेत ४५ प्रश्न विचारले जातील. त्यापैकी कोणतेही ४० प्रश्न सोडविणे आवश्यक असतील.
3) परीक्षेचा कालावधी पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ७५ मिनिटे असेल.
4) या परीक्षेकरीता Negative Marking पध्दत लागु राहणार नाही.

5) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या परीक्षेसाठी फोटोकॉपी व पुनर्मुल्यांकनाची सुविधा कोणत्याही परीस्थितीत उपलब्ध होणार नाही.

**पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी:-**

- पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम व व्दितीय वर्ष एम.ए.,एम.कॉम., व एम.एस्सी. वर्गाच्या संत्रात परीक्षा प्रचलीत (ऑफलाईन) पध्दतीने दीर्घोत्तरी स्वरूपात घेण्यात येतील.

- **स्वायत्त महाविद्यालय परीक्षा विभागाने निच्छित केलेले पदव्युत्तर परीक्षेचे स्वरूप खालील प्रमाणे राहील.**

1) पदव्युत्तर स्तरावरील परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप दीर्घोत्तरी स्वरूपाचे असेल व परीक्षेसाठी एकुण गुण पॅटर्ननुसार राहतील.
2) परीक्षेचा कालावधी पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ०३ तास ४५ मिनिटे असेल. (नियमीत ०३ तास व प्रत्येक तासाला १५ मिनिट अतिरिक्त वेळ)

**अंध/अपंग विद्यार्थ्यांसाठी:-**

- प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए, बी.कॉम, बी,एस्सी, बी.बी.ए, बी.सी.ए, बी.व्होक आणि प्रथम व द्वितीय वर्ष बी.व्ही.ए. वर्गाच्या अंध/अपंग विद्यार्थ्यांनी MCQ पध्दतीने परीक्षा देण्यासाठी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्ष एम.ए., एम.कॉम., व एम.एस्सी. वर्गाच्या अंध/अपंग विद्यार्थ्यांनी दीर्घोत्तरी स्वरूपात परीक्षा देण्यासाठी जास्तीची वेळ, लेखनिक मिळणेसाठीचा अर्ज, त्यासोबत जिल्हा शल्य चिकित्सक यांनी नजीकच्या कालावधीत निर्गमित केलेले प्रमाणपत्र, लेखनिक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीचा फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र व लेखनिकाचे संमतीपत्र सोबत जोडून महाविद्यालयाच्या कार्यालयातील श्री. गौरव चौधरी यांच्याकडे १८-०५-२०२२ पर्यंत जमा करावेत. लेखनिक हा विद्यार्थी ज्या वर्गाची परीक्षा देत असेल त्या वर्गापेक्षा कमी शिकलेला असावा. याची नोंद संबंधित विद्यार्थ्याने घ्यावी.

(डॉ. जे. एन. चौधरी)
**परीक्षा नियत्रंक**

MOOLJI JAITHA COLLEGE, JALGAON
NAAC GRADE 'A' CGPA-3.15 (3rd CYCLE)
AUTONOMOUS

(प्रा. डॉ. सं. ना. भारंबे)
**प्राचार्य**